भाग १

# मूठभर गोष्टी



**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**

**समग्र शिक्षा अभियान-शिक्षण विभाग**

# संवाद...

महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षकांच्या सर्जनशीलतेला आवाहन करून त्यांच्यातील प्रतिभा कथारूप पुस्तकाच्या निमित्ताने आपल्यासमोर ठेवतांना मला मनस्वी आनंद होत आहे.

कथा या विद्यार्थी व शिक्षकांचे भावविश्व उमलवू शकतात. कथा सांगताना शिक्षक व विद्यार्थी भेद विसरून एकाच भावनिक पातळीवर स्थिरावतात. आनंद, सुख, दु:ख, भीती, त्याग, बंधुभाव, निष्ठा, प्रेम इ. भावना ते एकाचवेळी समरसून अनुभवतात. वर्गाध्यापनाच्या दृष्टीने आपला परंपरेने चालत आलेला हा ठेवा अतिशय महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांचा शब्दसाठा वाढवणे, वाक्यरचना शिकवणे, भावना व्यक्त करणे, श्रवण, संभाषण या कला विकसित करणे यासाठी कथा हे माध्यम मध्यवर्ती भूमिका बजावते.

सर्व शाळा प्रगत करणे व गुणवत्ता विकास करणे हे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. शिक्षकांमधल्या अंत:स्फूर्तीला, नवनिर्माणक्षमतेला नवे क्षितिज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच ज्या शिक्षकांच्या क्षमतेवर गुणवत्तेचा रथ ओढावयाचा आहे ती विकसित करणेही गरजेचे आहे. ही बाब ओळखून म.न.पा. आयुक्त, मा. डॉ. निपुण विनायक तसेच श्रीमती डॉ. निधी विनायक यांच्या प्रेरणेमधून 'मूठभर गोष्टी' हा कथासंग्रहाचा उपक्रम साकार होत आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू भाषेतून कथा लिहिल्या आहेत. शिक्षकदिनी या पुस्तकाचे विमोचन करून सर्व कथालेखक शिक्षकांचा सत्कार करत आहोत. हा आमचा पहिलाच उपक्रम असल्यामुळे आपण निदर्शनास आणून दिलेल्या सूचनांचे भविष्यात स्वागत राहील.

या कामी सहकार्य करणारे साहित्यिक श्रीमती डॉ. लीला शिंदे, प्रा. डॉ. दासू वैद्य, श्री. उद्धव भयवाळ, डॉ. विशाल तायडे, श्री. अबु बकर रहेबर, श्री. संजय कुलकर्णी यांचे विशेष आभार.

**श्रीकांत कुलकर्णी,**
शिक्षणाधिकारी
म.न.पा., औरंगाबाद


**प्रेरणा व संकल्पना**

डॉ. निपुण विनायक, (भा.प्र.से.)
आयुक्त, म.न.पा. औरंगाबाद
डॉ. श्रीमती निधी विनायक

**मुद्रक :**

ड्रीम्स् प्रिंट ॲण्ड पॅक
एम.आय.डी.सी. चिकलठाणा,
औरंगाबाद. मो. 8888888011

**प्रकाशक :**

श्रीकांत कुलकर्णी
शिक्षणाधिकारी,
म.न.पा. औरंगाबाद

**मुखपृष्ठ संकल्पना**

श्री. ज्ञानेश्वर असोलकर
(कलाशिक्षक)
श्री. विनोद भोरे
(कलाशिक्षक)

**मुद्रितशोधन :**

डॉ. नागेश अंकुश

**विशेष साहाय्य :**

ज्ञानदेव सांगळे
स.का.अ.म.न.पा.
संजीव सोनार प्र.सां.अ.

**परीक्षक तथा मार्गदर्शक समिती**

श्रीमती डॉ. लीला शिंदे
प्रा. डॉ. दासू वैद्य
डॉ. विशाल तायडे
श्री. उद्धव भयवाळ
श्री. अबू बकर रहेबर
श्री. संजय कुलकर्णी

# मूठभर गोष्टी

## भाग १

औरंगाबाद महानगरपालिका
शिक्षण विभाग

# अनुक्रमणिका


१. प्राणी खरे मित्र ..........१
२. अंतर्मनाचा आवाज ..........३
३. धार ..........५
४. चतुर कोकरू ..........७
५. राजू शहाणा झाला..........८
६. प्राणी झाले टेक्नोसेव्ही (तंत्रस्नेही) ..........१०
७. खरा मित्र ..........१२
८. मस्तीची पाठशाळा ..........१४
९. आई-बाबा ..........१६
१०. संगतीचा परिणाम ..........१८
११. अखेर चांदोमामा सापडला! ..........२०
१२. एकीचे सामर्थ्य..........२१
१३. अनिलचे परिवर्तन ..........२२
१४. मोती संस्काराचे ..........२४
१५. कष्टाचे फळ ..........२६
१६. पहाड कापणारा देवमाणूस ..........२७
१७. बदललेला मित्र ..........२९

# प्राणी खरे मित्र

एका खेडेगावात एक शेतकरी कुटुंब राहत होते. त्यांच्याकडे आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहापुरती शेती होती. शेतात अपार कष्ट करून ते भरपूर पीक काढत. सदाशिव असे त्या शेतकऱ्याचे नाव. घरात तो, त्याची पत्नी सुरेखा, दोन मुले व त्याचे आई-वडील असे सहा सदस्य होते.

शेती करण्यासाठी त्याने छान खिल्लारी जातीची एक बैलजोडी घेतली होती. दोन्ही बैलं चपळ, कामसू होती. त्यांना कधीही कामास जुंपले तरी ते थकत नसत. त्यांच्यासमोर घरातील लहान-मोठा कोणताही सदस्य गेला तरी ते आपली शिंगे किंवा मानही हलवत नसत. त्यांच्या या गुणांमुळे त्यांची कुणीही सोड-बांध, चारा-वैरण, पाणी पाजणे यासारखी कामे करत असे. सदाशिवचेसुद्धा आपल्या बैलांवर जीवापाड प्रेम होते. तो पहाटेसुद्धा बैलांना वैरण घाली. बैलांना हिरवा चारा, मिळत असल्याने ते दोन्ही बैल ताजेतवाने, गुटगुटीत होते. गावातील सर्व गावकरी मंडळी सदाशिवच्या बैलांचे गुणगाण गात.

सदाशिवचा स्वभाव चांगला असल्याने त्याचे अनेक मित्र होते. फावल्या वेळेत सदाशिव व त्याचे मित्र गप्पा गोष्टी करत बसत. अशा गप्पा गोष्टीच्या बैठकीतून सदाशिवला पुढे दारु पिण्याची सवय लागली. तो खूप दारुच्या आहारी जाऊ लागला. घरातल्या सर्वांनी त्याला समजावले; पण त्याने सगळ्यांकडे दुर्लक्ष केले. त्यांच्या या वागण्याने घरातील वातावरण बिघडू लागले. मुलांवर मानसिक परिणाम होऊ लागला. परिस्थिती हाताबाहेर जात होती.

एके दिवशी सदाशिव दारु पिऊन घरी आला आणि बैलांसमोर वैरण घालण्यास गेला तेव्हा बैलजोडीतील एक बैल त्याच्या अंगावर धावून आला. सदाशिव घाबरला, असे त्याच्यासोबत कधीच झाले नव्हते. त्याला वाटले अंधारात बैलाने ओळखले नसेल म्हणून त्याने नेहमीप्रमाणे त्यांना वैरण घातली व झोपण्यास गेला.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे बैलांना शेतातील कामासाठी तो घेऊन गेला. दिवसभर त्याने शेतात बैलांना कामास जुंपले. सगळं सुरळीतरित्या पार पडलं. सायंकाळी त्याने बैलांना घरी दावणीला बांधले, त्यांना चारा टाकला व घरी चहा-पाणी घेऊन तो मित्रांकडे गेला. तेथे पुन्हा दारु पिऊन तो घरी आला आणि बैलांना चारा टाकण्यासाठी गेला.

नेहमीप्रमाणे बैलं उठून उभी राहिली. सदाशिव पुढे जाण्यास पाऊल उचलणार तोच त्यातील बैल मारण्यास धावला. सदाशिव घाबरून मागे सरकला. त्याला आश्चर्य वाटले की, बैलांनी दिवसभर तर काही केलं नाही आणि आता मारण्यास धावतो. नाराज होऊन तो घरी गेला व आपल्या पत्नीस म्हणाला, ''सुरेखा, आपले बैल काहीतरी विचित्र वागताहेत. दिवसभर चांगले राहतात आणि रात्री मला मारण्यास धावतात. तुलाही असंच करताय का ?'' सुरेखा म्हणाली, ''मी तर असं काही बघितलं नाही. सगळं तर ठीक वाटतंय मला. माझ्यासोबत तर ते असं बिलकुल वागत नाही. मला असं वाटतंय की त्यांना तुमच्यातला बदल जाणवत असेल. दारु पिल्यानंतर म्हणूनच ते असं वागताय.'' सदाशिव विचारात पडला आणि त्याने मनाशीच ठरवले की, बघूया तरी उद्या संध्याकाळी दारु न पिता जाऊन कदाचित सुरेखा खरं बोलतही असेल. बैलांच अस वागणं त्याला चांगलच खटकलं होतं. विचार करत करतच तो झोपी गेला.

नेहमीप्रमाणे त्याचा दिवस सुरळीत गेला. रात्रीची वेळ झाली. अन् तो दारु पिला नव्हता. मग तो वेळेवर बैलांना वैरण टाकायला गेला आणि नवल म्हणजे कोणताही बैल त्याला मारण्यास धावला नाही. सदाशिवला विलक्षण आनंद झाला. त्याने विचार केला की जर दारूमुळे माझ्यासाठी प्रिय असणाऱ्या गोष्टी जर दूर जाणार असतील तर नक्कीच ही सवय खराब आहे. क्षणिक सुखासाठी भरकटण्यापेक्षा, अशी सवय बंद करणे हाच खरा उपाय आहे! सदाशिवला आपली चूक समजली आणि त्याने दारु न पिण्याचा निर्णय घेतला.

कालांतराने त्याचे जीवन सुरळीत झाले. पूर्वीसारखी घरात शांतता निर्माण झाली. घरात आनंदाचे वातावरण राहू लागले. अशा प्रकारे बैलांनी सदाशिवची दारुच्या व्यसनातून मुक्तता केली.

**शोभा निकम (स.शि.)**

म.न.पा. कें.प्रा.शा.
प्रियदर्शनी, इंदिरानगर,
औरंगाबाद.



# अंतर्मनाचा आवाज

एका घरात चिंटू, त्याची आई व बाबा राहत असे. चिंटू हा एकुलता एक मुलगा असल्याने तो दोघांचाही लाडका. आई व बाबा चांगल्या पदावर नोकरीलाही होते. घरात कशाचीही कमी नव्हती. सुट्टी असली की सर्व जण बाहेर फिरायला जात व तेथून काहीतरी आठवण म्हणून वस्तू आणत व घरात सजवून ठेवत.

असेच एकदा ते सर्व जण बाहेर देशात सिंगापूरला फिरायला गेले, तेव्हा चिंटूच्या आई व बाबांनी खूप सुंदर असा फूलदानी विकत घेतला. त्यांना तो खूपच आवडलेला होता. घरी आल्यावर त्यांनी तो हॉलमध्ये सर्वांना दिसेल असा ठेवला. घरी कोणी पाहुणे आले की, ते त्याबद्दल माहिती देत. चिंटू, त्याची आई, बाबा त्यांना तो कुठून व कसा आणला याबद्दल आवडीने सांगत.

एके दिवशी चिंटूच्या आईच्या ऑफीसमध्ये काही महत्त्वाचे काम होते म्हणून त्यांनी चिंटूला फोन करुन सांगितले की, 'अरे, चिंटू आज  मला यायला रात्री थोडा उशीरच होणार आहे व बाबांनाही काही काम असल्याने तेही आज जरा उशिराच घरी येतील. तर तू घरात एकटाच आहेस, घर व्यवस्थित आतून बंद कर, जास्त टी.व्ही. पाहू नकोस. सकाळीच मी जास्त स्वयंपाक केलेला होता. ते गरम करून खाऊन घे. अभ्यास करून झोपून जा. आम्ही येतोच. घराच्या चाव्या आहेत आमच्याकडे.'' असं सांगत चिंटूच्या आईने फोन ठेवला. इकडे चिंटूला मात्र आनंद झाला. त्याला वाटले की अरे बरे झाले, आता मला मनसोक्त टी.व्ही. पाहता येईल ! गाणी ऐकता येईल, मस्ती करता येईल. मला कोणीही रागवणार नाही.''

चिंटूनेपण घरात खूप मस्ती केली. टी.व्ही. पाहिला, जेवण केलं नंतर जोरजोरात गाणे वाजवून तो नाचू लागला. इकडून-तिकडे उड्या मारू लागला आणि नाचता-नाचता त्याचा हात लागून तो सिंगापूरहून आणलेला फ्लॉवरपॉट खाली पडला अन् तो फुटला. एवढ्यात त्याच्या आईच्या गाडीचा हॉर्न चिंटूला ऐकू आला. चिंटू घाबरला. त्याला काय करावे ते सुचेना. मग त्याने तो फ्लॉवरपॉट व त्याचे तुकडे उचलले अन् एका बॅगमध्ये भरले व ठेवून दिले आणि रूममध्ये जाऊन झोपला.

चिंटूला काय करावे ते सुचेना, तो खूप घाबरलेला होता. आई-बाबांना खरं सागावं की खोटं हेही कळेना. तेवढ्यात त्याच्या बाबांनी घराचा दरवाजा उघडला. आत येऊन

पाहतात तर काय तो झोपलेला. त्यांनी प्रेमाने त्याच्या डोक्यावरून हात फिरवला व आपल्या रूममध्ये जाऊन झोपले. झालेल्या घटनेमुळे चिंटूला झोप येत नव्हती. त्याने हळूच रुमचा दरवाजा उघडला व बाहेर हॉलमध्ये आला. त्याने ती बॅग घेतली व फेव्हीकॉल घेऊन फ्लॉवरपॉटचे तुकडे जोडायला सुरुवात केली. काही वेळानंतर त्याच्या मेहनतीला यश मिळाले. व तो फ्लॉवरपॉट त्याने चिकटवून त्याच्या पहिल्या जागेवर नेऊन ठेवला व झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी चिंटूला त्याची आई उठवायला आली. अरे चिंटू ऊठ ना, उशीर होतोय, सकाळ झाली बघ, शाळेत नाही का जायच तुला ? चिंटू ही आईची हाक ऐकून उठला सर्व तयारी केली. पण त्याचे मन काही त्याला स्वस्थ बसू देईना. त्याला सारखं मनात वाटू लागलं की आपण काल रात्री केलेला प्रताप आई-बाबांना सांगूयात.

आणि शेवटी न राहवता त्याने शाळेत न जाण्याचा बहाणा करत म्हणाला, ''आई-बाबा, थांबा, मला तुम्हाला काही सांगायचय पण तुम्ही मला रागावणार तर नाही ना?, मला माहितीय की मी असं करायला नको होतं ते पण...'' पण काय म्हणत आई-बाबा त्याला विचारू लागले. तोच चिंटूने कालची सर्व हकीकत त्यांना सांगितली. ते ऐकून चिंटूच्या आई-बाबांनी एकमेकांकडे पाहिले आणि हसत म्हणाले, अरे एवढचं ना ? नाही, नाही आम्ही तुला मुळीच रागावणार नाही. हे बघं चिंटू मला माहितीये की ती वस्तू आमच्या खूप आवडीची होती पण तुझ्याएवढी नाही. ती आज न उद्या तुटलीच असती किंवा खराब झाली असती. उलट आम्हांला खूप आनंद आहे की ही गोष्ट तू आमच्यापासून लपवून ठेवली नाहीस. तुझ्याकडून चूक झाली आहे ही तू मान्य केलीस. ती सुधारण्याचा प्रयत्नही केलास. त्याबद्दल तुझे खूप खूप कौतुक. तू तुझ्या अंतर्मनाचा आवाज ऐकलास. त्याच्या आई-बाबांनी त्याला जवळ घेतलं व तिघेही हसू लागले.



**ए. डब्ल्यू. कांबळे (स.शि.)**

म.न.पा. कें.प्रा.शा. बेगमपुरा, औरंगाबाद

# धार

रामपूर नावाचे एक गाव होते. त्या गावामध्ये विलास नावाचा मजूर राहत होता. गावामध्ये त्याचे छोटेसे घर होते. त्यामध्ये त्याची बायको व दोन मुली राहत होत्या. विलास रोज जंगलातील वाळलेल्या झाडांची लाकडे फोडण्याचे काम करायचा. तो दिवसातून जेमतेम दोन झाडांची लाकडे फोडण्याचे काम पूर्ण करायचा. एका झाडाचे त्याला १०० रुपये मिळायचे असे त्याला रोज २०० रुपये मिळायचे. त्या मजुरीवर त्याचा घरखर्च भागायचा. काहीच पैसे शिल्लक राहत नव्हते.

एकदा काय झाले एक नवीन राजू नावाचा मजूर त्याच्या मालकाकडे कामाला लागला. रोज त्याचा मालक त्याला ४००, ५०० रुपये मजुरी द्यायचा. विलास नेहमी विचार करायचा, 'मी जेवढा वेळ काम करतो, तेवढाच वेळ राजूही काम करतो मग मालक त्याला जास्त मजुरी कसे काय देतात ?' असे करता करता बरेच दिवस निघून जातात. पुढे राजू स्वत:चे छोटेसे घरही विकत घेतो.

विलासला काहीच कळत नव्हते की, राजूला मालक एवढी मजुरी कशी देतात. शेवटी विलास मोठी हिंमत करुन आपल्या मालकाला विचारतो की, ''मालक मी जेवढा वेळ काम करतो तेवढाच वेळ राजूही काम करतो तर तुम्ही त्याला माझ्यापेक्षा जास्त मजुरी कसे काय देता?'' मालक म्हणतो की, ''तू हा प्रश्न राजूला विचार तो माझ्यापेक्षा जास्त तुला छान उत्तर देईल''.



विलास राजूकडे जातो आणि राजूला विचारतो, ''राजू तुला एक प्रश्न विचारू का?'' राजू म्हणतो, 'विचार की', विलास म्हणतो ''तू आणि मी सारखाच वेळ काम करतो. मग मालक तुला माझ्यापेक्षा जास्त मजुरी कशी काय देतात ?'' राजू थोडा अचंबित होतो. थोड्या वेळाने लगेच त्याला सांगतो की, ''मला अगोदर तुझी कुऱ्हाड दाखव.'' विलास आपली कुऱ्हाड राजूला दाखवतो. राजू म्हणतो, ''या कुऱ्हाडीला किती गंज चढला आहे. तू या कुऱ्हाडीला धार कधी लावली होती ? तुझी कुऱ्हाड किती बोथट झाली

आहे.'' मग विलास म्हणतो की,'' तीन महिन्यापूर्वीच ी या कुऱ्हाडीला धार लावली होती.''

राजू म्हणतो, ''अरे मित्रा तेच तर तुझे चुकले. तू कुऱ्हाडीला नियमित धार लावत नाही, त्यामुळे तुला जास्त लाकडे फोडता येत नाहीत. मी माझ्या कुऱ्हाडीला रोज धार लावतो. म्हणून मी तुझ्यापेक्षा दुपटीने लाकडे फोडतो, म्हणून मला पगार जास्त मिळतो.'' विलासला राजूचे म्हणणे पटते. तोही आपल्या कुऱ्हाडीला रोज धार लावायला लागतो आणि त्यालाही भरपूर मजुरी मिळू लागते.

**गायत्री रघुनाथ जाधव (स.शि.)**

म.न.पा., प्रा. शाळा, एकनाथनगर




# चतुर कोकरू



एकदा एका मेंढ्याच्या कळपातून एक कोकरू मागे राहिले होते. ते पाहून एक लांडगा त्याच्या पाठीमागे लागला. त्याच्या हातून आपण सुटत नाही, असे लक्षात येताच कोकरू लांडग्याला हसत म्हणाले, ''अरे, तू मला ठार मारणार हे मला माहीतच आहे. पण निदान आनंदाने तरी मरावं असं मला वाटतं, तेव्हा तू  जर तुझी मुरली मला वाजवून दाखवलीस तर मला आनंदाने मरण येईल.''

ते ऐकून लांडगा फारच आनंदीत झाला. आणि त्याने आपली मुरली वाजविण्यास सुरुवात केली. मुरलीच्या सुरावर कोकरू नाचू लागले. मुरलीचा आवाज ऐकताच जवळ असलेले कुत्रे धावत आले. त्याला पाहताच लांडगा घाबरून पळू लागला. पळता पळता तो मनाशीच म्हणाला, ''आपलं स्वत:च काम सोडून भलतेच करत बसलो. माझे शिकारीचे काम सोडून मी वाजंत्र्याचे काम करीत बसलो. हा माझा केवढा मूर्खपणा !''



**मिना स्वराज दाभाडे (स.शि.)**
म.न.पा. प्रा.शा. एकनाथनगर, औरंगाबाद.

# राजू शहाणा झाला...

एक राजू नावाचा मुलगा होता. रोज शाळेत जाणारा, अभ्यास करणारा, सर्व कामात उत्साहाने भाग घेणारा. अशा हुशार राजूची एक गोष्ट मात्र चांगली नव्हती. त्याच्याकडे व्यवस्थितपणा नव्हता. कपडे अस्वच्छ, केस विस्कटलेले, हातपाय अस्वच्छ असा सर्व गबाळा अवतार असायचा. आई सांगायची. ''आंघोळ कर.'' राजू नुसता अंगावर पाणी ओतायचा. ताई म्हणायची, ''जेवणापूर्वी हात धुतलेस का ?'' तेव्हा राजूला खूप राग यायचा. तो हातावर पाणी टाकून लगेच जेवायला बसे.



एके दिवशी राजूकडे गावाहून त्याची आवडती मावशी आली. राजू मावशीचा खूप लाडका होता. मावशीने राजूच्या अवताराकडे बघितले आणि मनात काहीतरी ठरवले. राजू बाहेर गेल्यावर मावशीने आईला विचारले तर आईने सांगितले की, नीटनेटकेपणा आणि स्वच्छता एवढ्याच बाबतीत तो दुर्लक्ष करतो.

सायंकाळी मावशीने राजूच्या आवडीचे पदार्थ तयार करून स्वयंपाक केला. राजू खेळून घरी आला. मावशीला म्हणाला, ''आई जेवायला वाढ. खूप भूक लागली आहे.'' मावशी म्हणाली, ''राजू हातपाय धुऊन ये, मी तुला जेवायला वाढते.'' राजू गेला आणि नेहमीप्रमाणे तांब्याभर पाणी हातावर ओतून आला. जेवायला बसला. मावशीने सर्व पाहिले आणि म्हणाली, ''राजू थोडं थांब, मावशीने एक काचेची मोठी वाटी आणली. राजूसमोर

ठेवली व मावशीने पाणी टाकले व त्याला चोळून हात स्वच्छ धुण्यास सांगितले. हात धुतलेले काचेच्या वाटीत पडलेले पाणी गढूळ, घाण दिसत होते. मावशीने वाटी राजूसमोर धरली. म्हणाली, ''आधी हे पाणी पी, मग जेवण कर ! राजू म्हणाला, 'मावशी हे पाणी किती घाण आहे कसे पिऊ ?'' मावशीने सांगितले, ''तू हात नीट धूत नाहीस तेव्हा ही हाताची घाण तुझ्या पोटातच जाते की नाही ?

आपली मावशी काय सांगत आहे हे राजूला समजले. तो म्हणाला, ''मावशी, आता मला समजले! आपले आरोग्य चांगले ठेवण्यासाठी आपण स्वच्छ आणि नीटनेटके राहायला हवे.!''

**हेमा राधेशामदास वैष्णव –(स.शि)**

म.न.पा. कें.प्रा.व मा.वि.,हर्सूल गाव, औरंगाबाद



# प्राणी झाले टेक्नोसेव्ही (तंत्रस्नेही)



एक घनदाट जंगल होते. या जंगलाचा एक रुबाबदार राजा होता

'सिंह !' या जंगलात वाघ, हरिण, चित्ता, कोल्हा, लांडगा, ससा, माकड, वनगाय इ. प्राणी आपल्या कुटुंबीयासोबत आनंदाने या जंगलात राहत असत. सर्व प्राणी, राजा म्हणून सिंहाला थोडे टरकूनच राहत असत.

मित्रांनो, आजच्या जगात आपण जसे गाडी, मोबाइल, टॅब, लॅपटॉप वापरतो. अगदी तसेच हे प्राणीसुद्धा हे सर्व 'गॅजेट्स' अगदी सफाईदारपणे हाताळत असत. आजच्या युगात प्राण्यांपर्यंत या गोष्टी पोहचल्या नसत्या तर आश्चर्यच म्हणावे लागले असते.

जंगलाचा राजा 'सिंह' याच्याकडे एक गाडी होती. जंगलात सर्वांवर नजर ठेवता यावी म्हणून तो गाडीवरून सगळीकडे फिरायचा. त्याच्या गाडीचा आवाज ऐकूनच सगळ्या प्राण्यांना, आपला राजा जंगलात फिरत आहे याची चाहूल लागे, कारण राजाकडे कोणती गाडी होती माहितीये का मित्रांनो ? अर्थातच् 'बुलेट..!!'

आपल शहर जसं सुखसोयींनी समृद्ध असतं अगदी तसंच हे जंगलदेखील विविध सुखसोयींनी समृद्ध होत. जंगलात प्राण्यांची शाळा होती, त्या शाळेतील प्रत्येक प्राण्याकडे पुस्तकाबरोबर 'टॅब' ही होता. ते 'टॅब' वर अभ्यास करीत असत.

या जंगलात एका माकडाचा 'मॉल' होता. विविध वस्तू त्याच्या मॉलमध्ये विकण्यासाठी होत्या. ते माकड 'लॅपटॉप' वर त्याच्या दुकानाचा हिशेब करीत असे. तसेच त्याच्या दुकानात 'ऑनलाइन' पेमेंटची' सुविधा त्याने उपलब्ध करून दिली होती.

जंगलात सगळीकडे जातीने लक्ष ठेवणे सिंहाला शक्य नव्हते, म्हणून त्याने जंगलाचे विशिष्ट भागात वर्गीकरण करुन एका-एका प्राण्याला त्या भागाचा प्रमुख म्हणून घोषित केले. मात्र या सर्वांशी संपर्क राहावा म्हणून राजा सिंहाने एक युक्ती केली, सर्व प्राण्यांचा एक 'व्हॉटस् ॲप ग्रुप'

तयार केला व त्याला नाव दिले 'प्राण्यांची सभा'. सिंहाला काही आदेश द्यायचा असल्यास सिंह त्या ग्रूपवर मॅसेज पाठवत असे, प्रमुख प्राणीही त्याची तत्काळ अंमलबजावणी करीत असत. तसेच प्राण्यांनाही काही अडचणी आल्यास त्या ग्रुपवर ते राजाशी चर्चा करीत असत.

या युक्तीमुळे राजाला सर्वांशी संपर्क साधणे व आपल्या जंगलातील प्रत्येक प्राणी सुखी राहावा म्हणून प्रयत्न करणे अतिशय सोपे झाले. मनात आणले तर कुठलीही गोष्ट आत्मसात करणे कठीण नसते. अशा रीतीने जंगलातील सर्व प्राणी आनंदाने एकत्र राहू लागले.

बघितले मित्रांनो, तंत्रज्ञानाचा वापर जर चांगल्या कामासाठी केला तर त्यातूनच आपल्याला विविध फायदे होतात. जसे की वेळेची बचत होते, नवीन ज्ञान आत्मसात करण्यास मदत होते. म्हणून आपण सर्वांनी तंत्रस्नेही होऊन चांगल्या कामासाठी त्याचा वापर केला पाहिजे.

**प्रतिभा बाबासाहेब टेमकर (स.शि.)**

म.न.पा. प्रा.शा. पडेगाव, औरंगाबाद



# खरा मित्र

डोंगराच्या कडेला वेडीवाकडे वळणे घेत वाहणारी कल्याणी नदी. त्या नदीच्या कडेला धांडेगाव नावाचं छोटसं गाव. गावाशेजारी जिल्हा परिषदेची अतिशय सुंदर अशी शाळा. गावातील सर्व मुले याच शाळेत जात असत. सर्व मुलांच या शाळेवर खूप प्रेम. मुलांना शाळा खूप-खूप आवडायची ! या गावात गोरख नावाचा मुलगा होता. तो पायाने अपंग असल्यामुळे तो कुबडयाच्या साहाय्याने चालत असे. याच जिल्हा परिषद शाळेत तो आपल्या मित्रांसोबत इयत्ता ३ री वर्गात शिकत होता. त्याच्याच वर्गातील वैभव नावाचा मुलगा गोरखच्या घराशेजारी राहत असे. गोरख अपंग असल्यामुळे वैभव त्याचा तिरस्कार करत असे. मुले गोरखला खेळात घेत नसत. त्यामुळे गोरखला वाईट वाटत असे. पण त्याला आपले सर्व मित्र खूप प्रिय होते.

सकाळी लवकर उठून शाळेची तयारी करून वेळेवर शाळेत जाणे, शाळा सुटल्यावर घरचा अभ्यास पूर्ण करुन नदी शेजारी असलेल्या मैदानावर जाणे, असा सर्व मुलांचा नित्यक्रम होता. विटीदांडू, कबड्डी, क्रिकेट, लंगडी, लपंडाव, अंधळी कोशिंबिर असे विविध खेळ ही मुले मैदानावर खेळत असत. जेव्हा सर्व मुले खेळत असत तेव्हा गोरख एका दगडावर बसून हा खेळ पाहत असे व आनंदी होत असे.



रोजच्याप्रमाणे आजही मुले मैदानावर खेळत होती. मुलांनी आंधळी कोशिंबिर हा खेळ खेळण्याचे ठरविले होते. गोरख दगडावर बसून खेळ पहात होता. खेळ चालू झाला. वैभववर राज्य आले. त्याचे डोळे बांधून मैदानावर सोडण्यात आले. खेळ रंगात आला. मुले खेळात तल्लीन झाली होती. अचानक मोकाट कुत्र्यांच्या टोळीने मुलांवर हल्ला चढविला, मुले घाबरून गेली सैरावरा पळायला लागली. वैभवचे डोळे बांधलेले असल्यामुळे त्याला काहीच कळले नाही. कुत्र्यांनी त्याला खाली पाडले. तो ओरडू लागला. तेव्हा आपल्या कुबड्या सावरत गोरख धावून आला. मोठ्या हिमतीने आपल्या कुबड्याच्या साहाय्याने कुत्र्यांना पिटाळून लावले व

वैभवला आधार देऊन उठवले.

ही बातमी गावभर पसरली. गावकऱ्यांनी गोरखच्या हिंमतीचे कौतुक केले. गोरखच्या आईवडिलांना गोरखचा अतिशय अभिमान वाटला. शाळेच्या समारंभात गोरखला स्टेजवर बोलावून त्याचा प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

त्या दिवसापासून वैभवला आपली चूक समजली आणि तो गोरखचा जिवलग मित्र बनला.

भरत गंगाधरराव भुंबर (साधन व्यक्ती)

म.न.पा. स.शि.अ., औरंगाबाद





# मस्तीची पाठशाळा

'चला मित्रांनो, तुम्हाला माहीत आहे का प्राण्यांचीसुद्धा शाळा भरते.

एक घनदाट जंगल होते. त्या जंगलात वेगवेगळे लहान मोठे प्राणी राहत होते. त्यामध्ये प्राण्यांची एक शाळा होती शाळेचे नाव होते, 'मस्ती पाठशाळा!' या शाळेमध्ये वेगवेगळे प्राणी जात होते. त्यामध्ये हत्ती, घोडा, गेंडा, हरीण, कुत्रा इत्यादी होते. या प्राण्यांपैकी मोती नावाचा कुत्रा फार आळशी होता. तो सतत शाळेला सुट्टी मारायचा. त्याला शाळेत जायचा फार कंटाळा येत. मात्र त्याला मित्रांसोबत खेळायला, मोबाइलमध्ये गेम खेळायला, कार्टून बघायला, मजा वाटायची. त्याला अभ्यासाचा फार कंटाळा यायचा त्यामुळे शाळेत शिकवलेले समजायचे नाही. मोती कुत्र्याचे मित्र आणि मैत्रिणी हे मात्र दररोज शाळेत जात असत.

अप्पू हत्ती व जिराफ दादाची फार मैत्री होती ते दोघे रोज शाळेत जायचे अभ्यास करायचे मस्ती करायचे शाळेतल्या गमती-जमती त्यांना आवडायच्या शाळेमुळे इतर प्राण्यांशी कसे बोलायचे, कसे वागायचे हे समजू लागले. शाळेत शिकवलेले समजून स्वतः अभ्यास करू लागले. त्यामुळे त्यांना अंकाची किंमत समजू लागली. दुकानाच्या पाट्या, गोष्टीचे पुस्तक आणि पेपर वाचता येऊ लागले. आइस्क्रीम, चॉकलेट, बिस्कीट घेतल्यावर पैसे किती द्यायचे हे समजू लागले. हिशेब करता येऊ लागला. अप्पू हत्ती व जिराफ दादा सर्वांना मदत करायचे त्यामुळे सर्वांचे आवडते मित्र झाले.



एक दिवस अप्पू हत्ती व जिराफ दादा यांनी मोती कुत्र्याला धडा शिकवायचे ठरवले. त्या सर्व मित्रांपैकी कोणीही कुत्र्यासोबत खेळायचे नाही असे

ठरले. मोती खेळायला गेल्यानंतर सर्वांना बोलवायचा; परंतु त्याच्या सोबत खेळायला कोणीही गेले नाही त्यामुळे तो रडू लागला. अप्पू हत्ती व जिराफ दादा त्याच्याकडे गेले, तेव्हा तू शाळेत जात नाहीस, सारखा टीव्ही – मोबाइल पाहतोस, चष्मा लागेल. शाळेत नाही आला तर आम्ही तुझ्यासोबत खेळणार नाही. शाळेत वाचायला , लिहायला खूप मजा येते . आम्ही तुझा अभ्यास घेऊ ,तुझ्यासोबत खेळू, मस्ती करू, असे समजून सांगितले.

मोतीला त्याची चूक कळली. तो म्हणाला, 'मी उद्यापासून शाळेत जाणार.' तेव्हा सर्व जण मोतीला घेऊन आनंदाने नाचू लागले.


**शिल्पा धमाले (विशेष शिक्षिका)**

म.न.पा., स.शि.अ., औरंगाबाद.




# आई–बाबा

एक गावात सदू नावाचा एक गरीब–मोलमजुरी करणारा माणूस राहत होता. तो हुशार होता, पण शिक्षण नसल्याने मोलमजुरी करण्याची वेळ त्याच्यावर आली होती. आपल्या बायकोसोबत तो एका छोट्याश्या पत्र्याच्या, तुटक्याश्या घरात राहत. गरिबीने पिचलेला संसार, बेकारीची कुऱ्हाड कोसळलेली. मिळाली तर मजुरी करणे नाहीतर कधी कधी उपाशी झोपण्याची वेळही त्याच्यावर येत असे. यामुळे तो निराश होऊ लागला.

एके दिवशी असाच तो आपल्या घरात बसलेला असताना त्याला आपल्या आई बाबांची आठवण झाली व तो आपल्या लहानपणीच्या आठवणीत हरवून गेला. आई बाबांसोबत लहानपणी खेळणारा सदू त्याला दिसू लागला. सदूचे लहानपण खूप मजेत गेले होते. सदूच्या वडिलांचे नाव किसन तर आईचे नाव राधा होते. सदूला ते मोठे करीत होते. कुसुम आणि सुमा या दोन बहिणी अतिशय आनंदात होत्या . त्याचे बाबा एका ठिकाणी शिपायाची नोकरी करीत होते. व ते आपल्या आई बाबांसोबत राहत होते.

किसनचे आपल्या मुलाबाळांवर जिवापाड प्रेम होते. मुलांनी शिकावे, मोठे व्हावे, आपले नाव कमवावे असे त्याला नेहमी वाटे. याकरिता आपली मुले शिकली पाहिजे तरच ती मोठी होतील, यावर त्याचा विश्वास होता, म्हणून त्याने आपल्या सर्व मुलामुलींना शाळेत टाकले होते. किसन आणि राधा आपल्या मुलांना शिकविण्यासाठी काबाडकष्ट करत.



सदू हा त्यांचा एकुलता एक मुलगा असल्यामुळे सर्वांचा लाडका होता. सर्व जण त्याचा खूप लाड करत असत. सदूचे वडील सर्व मुलांना नियमित शाळेत पाठवीत; परंतु अती लाडामुळे सदू वरचेवर शाळा बुडवू लागला. कधी तो पोटदुखी तर कधी डोकेदुखीचे कारण देत शाळा बुडवू लागल्यामुळे वरचेवर त्याचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ लागले. अतिलाडामुळे तो हट्टी व

खोडक़र बनला. घरात त्याला कोणी रागावत नसे,मारत नसे यामुळे सदू शाळेत मुलांच्या खोड्या काढू लागला, मारामारी करू लागला. त्यामुळे वर्गातील हुशार मुलांशी त्याचे पटेनासे झाले. आता वर्गातील खोडकर मुलांशी त्याची गट्टी झाली. त्यामुळे त्याचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊन तो पूर्णतः वाया जाऊ लागला. घरी वडील आपल्या कामात तर आई घरकाम व इतर कामांमध्ये व्यग्र असे. त्यामुळे ते सदूकडे पुरेसे लक्ष देऊ शकत नसत. आईवडील सदूला नेहमी चांगला उपदेश करत असत. त्याला शिक्षणाचे महत्त्व सांगत परंतु सदू फक्त तेवढ्यापुरते हो म्हणे आणि विसरून जात असे.

दिवसांमागून दिवस जाऊ लागले आणि सदूचे वागणे बिघडू लागले. त्याची भांडणे घरी येऊ लागली, शाळेतूनही शिक्षकांच्या तक्रारी येऊ लागल्या. एकदा वडिलांनी सदूला जवळ घेतले त्याला समजावून सांगितले, बेटा,तू शिकलास तरच तुला मोठेपणी चांगली नोकरी मिळेल, तुला तुझे जीवन चांगले जगता येईल! आम्ही काय आज आहोत उद्या नाहीत, म्हणून बाळा तू वाईट वागणे सोड अन चांगलं शीक. वडिलांच्या या सांगण्याचा त्याच्यावर थोडा परिणाम झाला. त्याला वाटले की खरंच आपण चांगलं शिकलं पाहिजे परंतु पुढे पुन्हा आपल्या वाईट मित्रांच्या संगतीने आणि आई वडिलांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष केल्याने तो पुरता बिघडला व पुढे दहावी नापासही झाला. किसनने आपल्या छोट्याशा कमाईतून पै-पै जमवून मुलामुलींचे लग्न केले. आणि अचानक एके दिवशी रस्ता अपघाताच्या दुर्घटनेत किसन आणि राधा सदूला सोडून गेले. सदूवर दुःखाचा डोंगर कोसळला. या जगात आता त्याच्यासाठी कुणीही शिल्लक नव्हते. आता आपल्या कुटुंबाची जबाबदारी सदूवर येऊन पडली. शिक्षण मिळत नसल्याने काम मिळत नव्हते, मोलमजुरीशिवाय पर्याय नव्हता. दररोज मजुरीही नव्हती. अशा परिस्थितीत तो अडकला होता.

हा जीवनपट डोळ्यांसमोरून जात असताना आई वडिलांचे उपदेश,त्यांची काळजी,त्यांचे वेळोवेळीचे सांगणे सदूच्या डोळ्यासमोरून जात होते.आणि सदूच्या डोळ्यांतून सतत अश्रू वहात होते. आपल्या डबडबत्या डोळ्यांनी आपल्या झोपडीत बसून तो फक्त एकच म्हणत होता. मी आई वडिलांचे ऐकायला हवे होते. मी शिकायला हवे होते! मी शिकायला हवे होते!

**शशिकांत मोहन उबाळे (स.शि.)**

म.न.पा. प्रा.व मा.वि.प्रियदर्शनी, इंदिरानगर,औरंगाबाद

# संगतीचा परिणाम

सावंगी गावामध्ये सुरेश आणि दीपक नावाचे दोन छोटे मित्र राहत. दोघेही नेहमी सोबत फिरायचे, खेळायचे. दोघांच्याही पालकांनी त्यांचा एकाच शाळेत प्रवेश घेतला. सुरेश आणि दीपक अगदी मजेत, आनंदाने शाळेत जात, अभ्यास करत. पाहता पाहता दोघेही चांगल्या गुणांनी चौथी इयत्ता उत्तीर्ण झाले.

सावंगीमध्ये मात्र इयत्ता चौथीपर्यंतच शाळा होती. त्यामुळे पुढील शिक्षणासाठी दुसऱ्या गावाला जाण्याशिवाय पर्याय नव्हता. दीपकच्या घरची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने त्याच्या पालकांनी त्याला शहराच्या ठिकाणी वसतिगृहात शिक्षणासाठी पाठविण्याचे ठरवले आणि इकडे मात्र सुरेशच्या घरची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्याच्या पालकांनी त्याला मामाच्या गावी शिक्षणासाठी पाठविण्याचे ठरवले-जिथे इयत्ता दहावीपर्यंत शाळा होती. सुरेश व दीपक दोघांनाही एकमेकांपासून दूर जाणार या भावनेने वाईट वाटले. दोघेही खूप रडत असत

जून महिना उजाडल्यावर ठरल्याप्रमाणे दीपक शहराच्या ठिकाणी वसतिगृहात राहायला गेला आणि सुरेश मामाच्या गावी गेला. सुरुवातीचे काही महिने दोघांनाही घरची आठवण स्वस्थ बसू देत नव्हती. दोघांनाही एकमेकांची सोबत आठवायची आणि दोघेही त्याच आठवणीत रममाण होऊन जायचे. हळूहळू सवय होता होता दोघेही अभ्यासात रमले. खूप अभ्यास करू लागले. अशीच चार - पाच वर्षे निघून गेली आणि दोघेही इयत्ता दहावीत गेले.



दहावीत गेल्यावर दीपकचे मित्र बदलले त्याला दुसऱ्याच मित्रांची संगत लाभली जे अजिबात अभ्यासू नव्हते. त्या मित्रांसोबत राहून राहून दीपकदेखील अभ्यासाकडे दुर्लक्ष करू लागला. त्यामुळे अभ्यासात तो मागे पडला. शाळेत होणाऱ्या सराव परीक्षेत त्याला खूप कमी गुण मिळाले. इकडे सुरेशला आपल्या

आर्थिक बिकट परिस्थितीची जाणीव होती की, आपल्याला पैशाअभावी शहरात शिक्षणासाठी जाता आले नाही. म्हणून खूप अभ्यास करून खूप मोठे होऊन आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याच्या जिद्दीने सुरेश खूप अभ्यास करू लागला. त्याच्या अभ्यासामुळे त्याला बोर्ड परीक्षेत घवघवीत यश मिळाले. सुरेशचे अभिनंदन व कौतुक करण्यासाठी सुरेशला त्याच्या गावी बोलावण्यात आले. गावी गेल्यावर सरपंचांनी मिरवणूक काढून जल्लोषात स्वागत केले. हे सर्व पाहून सुरेशच्या आई-वडिलांचा आनंद गगनात मावेना.

मिरवणुकीनंतर सुरेश दीपकच्या घरी त्याला भेटण्यासाठी गेला, तेव्हा दीपक रडायला लागला. कारण तो बोर्ड परीक्षेत अनुत्तीर्ण झाला होता. ते ऐकून सुरेशलादेखील वाईट वाटले. त्याने दीपकला धीर दिला, प्रोत्साहन दिले व पुन्हा अभ्यासासाठी शुभेच्छा दिल्या. दीपकला त्याची चूक लक्षात आली व त्याने पश्चाताप व्यक्त केला आणि आता मी खूप अभ्यास करणार असा विश्वास दिला.

**शुभांगी कदम (स.शि.)**

म.न.पा. प्रा.शा. उस्मानपुरा, औरंगाबाद

# अखेर चांदोमामा सापडला



चिमुरडी जुई म्हणजे एक अजब नमुना! जुई अतिशय हुशार, गोड, निरागस आणि अतिशय बडबडी होती. तिच्या डोक्यात भन्नाट विचार चालू असण्याने ती सर्वांना हवीहवीशी वाटायची.

जुईची मैत्री जमते ती आकाशातल्या चांदोमामाशी ती चांदोमामाला म्हणायची ''तुझे आई बाबा कुठे असतात?'' आकाशात एकटाच फिरतोस भीती नाही वाटत का ? रोज चालून चालून दमत नाहीस का ? तुझी गोष्ट मला आईने सांगितली. मामाच्या घरी जेवायला गेला होतास तेव्हा तुपात माशी पडली. तेव्हा तू उपाशीच झोपलास''

एकदा जुईला शाळेत चित्रकला स्पर्धेत बक्षीस मिळाले ते दाखविण्यासाठी ती चांदोमामाकडे गेली. तेव्हा तो कुठेच दिसेना? तो हरवला आहे असे वाटले. शेवटी जुईने ठरवले. सावंतकाका (पोलीस इन्स्पेक्टर) यांच्याकडे तक्रार करायचीच. सकाळी ती बाबांना घेऊन सावंत काकांकडे जाते.

जुई म्हणाली, ''तुम्ही जसे चोराला शोधून काढता..? तसं तुम्ही उद्या चांदोमामाला शोधून काढा.

तुला उद्या रात्रीपर्यंत चांदोमामा आकाशात नक्की दिसेल. दुसऱ्या दिवशी जुई गच्चीत जाऊन पाहाते तो काय ! उगवती चंद्रकोर आकाशात दिमाखाने हसत होती. तिला पाहून जुईला खूप खूप आनंद झाला.



बाबा आताच्या आता सावंतकाकांना फोन लावा, मला त्यांना धन्यवाद म्हणायचे आहे!

सुनीता जोशी (स.शि)

म.न.पा. कें.प्रा. शाळा,

प्रियदर्शनी इंदिरानगर, औरंगाबाद.

# एकीचे सामर्थ्य

एक लाकूडतोड्या नेहमी जंगलात जात असे. नेहमीप्रमाणे तो वाळलेली लाकडे गोळा करून विकायचा, तो मनाने चांगला व प्रामाणिक होता. एके दिवशी जंगलात त्याला हत्तीचे पिल्लू खड्ड्यात पडलेले दिसले, बाकीचे हत्ती त्याला काढायचा प्रयत्न करत होते; पण पिल्लू काही बाहेर येऊ शकत नव्हते.

लाकूडतोड्याने मोठ्या मनाने त्या खड्ड्यात माती टाकून हत्तीचे पिल्लू बाहेर काढले. त्यामुळे हत्ती व लाकूडतोड्या यांच्यात मैत्री झाली, हत्ती लाकूडतोड्याला वाळलेली लाकडे गोळा करायला मदत करायचे, सर्व आनंदाने चालले होते. काही दिवसानंतर हत्ती घाबरलेले दिसले, लाकूडतोड्याने कारण विचारले. तेव्हा एक दुष्ट वाघ नेहमी प्राण्यांची शिकार करतो व निरागस प्राण्यांना त्रास देतोय, हे त्याला कळले. सर्व ऐकल्यानंतर लाकूडतोड्या म्हणाला की, ''सर्व प्राण्यांनी एकीने राहायला हवे'', तेव्हाच वाघ कुणालाही त्रास देऊ शकणार नाही व कुणालाही मारू शकणार नाही, सर्व प्राणी एकोप्याने राहू लागले व एकमेकांना मदत करू लागले. जेव्हा वाघ शिकारीसाठी आला, तेव्हा सर्वांनी एकमेकांना आवाज दिला व सर्व प्राणी एकत्र जमले आणि वाघावर चालून गेले. प्राण्यांच्या अशा आक्रमणाने वाघ घाबरून गेला, तो पळून दूर गेला, हे बघून सर्व प्राणी खूश झाले व एकीची ताकद त्यांच्या लक्षात आली. त्या दिवसापासून सर्व प्राणी एकीने राहू लागले व एकमेकांना मदत करू लागले. अशा प्रकारे त्याचे आयुष्य आनंदमय झाले.

**प्रवीण प्रेमसुख लोहवे (स.शि.)**
म.न.पा. प्रा. शा. भावसिंगपुरा, औरंगाबाद.





# अनिलचे परिवर्तन

मुले खोड्या करणारच ! तसाच एक मुलगा होता. त्यांचे नाव होते अनिल हा वर्ग पाचवीत शिकत होता. तो एका झोपडपट्टीत राहत.

अनिलच्या वडिलांचे नाव रमेश व आईचे नाव आशा होते. अनिलच्या भावाचे नाव कपिल व बहिणीचे नाव शीला होते. अनिलची घरची परिस्थिती गरिबीचीच.

अनिलचे वडील नेहमी दारू पिऊन येत असत त्यामुळे आई व वडिलांमध्ये नेहमी भांडण होत असे. वडील हातात येईल ती वस्तू आईला मारत असत, एकदा भांडताना वडिलांनी आईच्या पायावर मारले. त्यामुळे तिचा पायच मोडला. तेव्हापासून अनिलची आई रागात घर सोडून गेली. ती कोठे गेली ते माहीत नाही. पण अनिल पोरका झाला. आई नसल्यामुळे (जवळ) वडिलांचा धाक नसल्यामुळे तो खूप उद्धट, शिवीगाळ करणारा बनला. बहिणीला आजी घेऊन गेली, त्यामुळे अनिलचा परिवार म्हणजे फक्त वडील व भाऊ असा झाला.

अनिल रोज. शाळेत यायचा आणि वर्गात सर्वांशी भांडण, खोड्या, शिवीगाळ करायचा. वर्गातून बाईंना न विचारता निघून जायचा, शिक्षकांशीदेखील उद्धटपणे बोलायचा. सर्व जण त्याला कंटाळून गेले होते. जो तो त्याला सुधारण्याचा प्रयत्न करत होता. पण तो काही सुधारत नव्हता. नेहमी अस्वच्छपणे शाळेत यायचा, कधीही कोणाला न घाबरणारा अनिल थोडा थोडा बदलत जाऊ लागला.

एकदा वर्गात बाईंनी सर्व मुलांना पासपोर्ट फोटो आणायला सांगितले. सर्व मुलांनी फोटो आणून दिले, पण अनिलने फोटो दिला नाही. त्याला विचारल्यावर तो म्हणाला 'बाई, मी फोटो काढले नाही. पप्पा घेऊन जात नाही. आज आणतो, उद्या आणतो असे सांगून त्याने फोटो आणले नाही.



एकेदिवशी बाई त्याला म्हणाल्या, ''अनिल, तू खाऊ

खाण्यासाठी पैसे खर्च करतो ना! तेव्हा तू ते पैसे आण, मी तुला शाळेतील मामाबरोबर फोटो काढण्यासाठी पाठवते.'' तो हो म्हणाला. दुसऱ्या दिवशी अनिलने खरोखरच २० रु. आणले व बाईंकडे दिले. बाईनी चौकशी केल्यावर कळाले की फोटोसाठी ३० रु. लागतात. बाईंनी त्याच्यासमोर स्वतः जवळील १० रु. टाकून मामाबरोबर त्याला फोटो काढण्यासाठी पाठविले.

दोन दिवसांनी मामांनी बाईकडे अनिलचे फोटो आणून दिले. बाई फोटो पाहताच म्हणाल्या 'काय सुंदर फोटो आला ! तू फोटोत खूप छान । गोरा दिसतोस वर्गातील मुले लगेच हसू लागली. बाईंनी सगळ्यांना सांगितले जर अनिलने रोज स्वच्छ आंघोळ केली तर तो फोटोसारखा छान दिसेल. तुमच्यापेक्षा छान सुंदर व स्वच्छ दिसेल ! अनिललादेखील मुलांबरोबर हसू आले. दुसऱ्या दिवशी अनिल शाळेत आला, तेदेखील एकदम स्वच्छ अंघोळ करून, धुतलेले कपडे घालून. बाईंनी सर्व मुलांना त्याचे टाळ्या वाजवून स्वागत करण्यास सांगितले. त्याला देखील आनंद झाला. याप्रमाणे तो रोज स्वच्छ कपडे घालून शाळेत येऊ लागला.

अभ्यासात अनिल हुशार होता; पण त्याला प्रेमाची, आपुलकीची गरज होती हे बाईंनी ओळखले त्यांनी इतर मुलांसमोर त्याचे कौतुक, प्रशंसा केली. त्यामुळे तो सुखावला. बाईंनी त्याला जवळ घेऊन वाचन, लेखन, गणिते घेतली. तो छान अभ्यास करू लागला. बाईंनी त्याला वचन दे म्हणून सांगितले. तो तयार झाला. ''तुम्ही जे म्हणाल ते मी करणार'' असे तो म्हणाला. बाई त्याला म्हणाल्या ''तू रोज शाळेत ये, अभ्यास कर, चांगला वाग, शिवीगाळ करू नको'' त्याला ते पटले, त्याने बाईना हो म्हणून वचन दिले.

कोणी काही खोडी काढली की, तो त्यांना शिवीगाळ न करता बाईकडे यायचा. बाईंनी त्याला साथ देऊन त्याचा आत्मविश्वास वाढवला. अशाप्रकारे अनिलचा दिवसेंदिवस खोडकरपणा कमी होऊ लागला व तो अभ्यास करु लागला.

**सुनीता पंडित पाटील (स.शि.)**
म.न.पा. कें.प्रा.शा. बन्सीलालनगर, औरंगाबाद.

# मोती संस्काराचे

योगेश नावाचा मुलगा होता. तो आई वडिलांचा थोरामोठ्यांचा खूप असे आदर करत असे. आईने सांगितलेली कुठलीही गोष्ट तो मन लावून पूर्ण करत असे. त्याच्या घरात आई. वडील आजी, आजोबा, बहीण असे सर्व जण होते. योगेशच्या मनावर आजी आजोबा, आई, वडील यांच्या संस्काराचा खूप प्रभाव पडलेला होता. आजी आजोबा रोज संध्याकाळी झोपण्यापूवी त्याला संस्कारपूर्ण गोष्टी सांगत. या संस्कारक्षम गोष्टींचा परिणाम योगेशच्या वागण्यातून दिसून येत होता. त्याच्या संपूर्ण आयुष्यावर त्या गोष्टींचा खूप प्रभाव पडलेला होता. एकदा आजोबाने त्याला आपण दीन-दुबळ्यांना मदत केली पाहिजे असे गोष्टीतून सांगितले  होते. त्यांनी यासाठी अभंगाचा दाखला दिला होता.

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।

तोची साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा ।।

त्याच्या मनामध्ये या ओळींनी घर केले.

एकदा योगेश आपल्या वडिलांबरोबर बाजारामध्ये खरेदी करण्यासाठी गेला होता. बाजाराचा दिवस असल्यामुळे रस्त्यावर प्रचंड गर्दी होती. एक वृद्ध आजोबा रस्ता ओलांडत असताना समोरून येणाऱ्या भरधाव गाडीने त्यांना जोराचा धक्का दिला. तेवढ्यात ते आजोबा धाडकन खाली पडले. ज्या गाडीने धक्का दिला ती गाडी जोराच्या वेगाने निघून गेली. क्षणाचाही विलंब न करता योगेशने वडिलांचा हात सोडला व पटकन त्या आजोबांकडे धावत गेला. काही सहकाऱ्यांच्या मदतीने त्याने आजोबांना उचलले. तेव्हा त्यांच्या डोक्यातून जोराचा रक्तस्त्राव सुरू होता. त्याने



स्वतःजवळील रुमाल काढून आजोबांच्या डोक्यावर बांधला व जवळच्या हॉस्पिटलमध्ये आजोबांना भरती केले. हे सर्व करत असताना त्याचे कपडे रक्ताने माखले होते. डॉक्टरांना देखील योगेश चे खूप कौतुक वाटले. आजोबांकडील सापडलेल्या कागदपत्रांच्या आधारे त्यांच्या घरच्या लोकांना माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु जवळचे असे त्यांचे कोणीही नव्हते आणि जरी असले तरी त्यांचे या वृद्ध आजोबांकडे लक्ष नव्हते हे सर्व आजोबांच्या कपड्यावरून व राहणीमाना वरुन दिसून येत होते.

योगेशने ठरवले की, आजोबांच्या हॉस्पिटलचा खर्च मी माझ्या जमवलेल्या पैशांमधून व इतर मित्रांच्या सहकाऱ्यातून पूर्ण करेल, योगेशचे वडील निमूटपणे आपल्या मुलाचे धैर्य बघत होते. त्यांनी आपल्या मुलावर केलेल्या संस्काराचा त्यांना सार्थ अभिमान वाटत होता. योगेश त्याच्या वडिलांकडे गेला, म्हणाला, 'आजोबांना कोणीच नाही.'' या आजोबांचा या दवाखान्याचा जो खर्च आहे तो मी माझे जमवलेले पैसे आहेत ना त्यातून केलेला चालेल का ?'' तेव्हा वडिलांकडून पटकन होकार मिळाला व त्यांनी सांगितले तुझ्या जमलेल्या पैशांमध्ये मी माझ्याकडचे पैसे देईन. हा सर्व संवाद तेथील उपचार करणारे डॉक्टर ऐकत होते. त्यांनी योगेशच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली व म्हणाले, 'योगेश, तुझ्या या कामात माझे सहकार्य असेल'' तेव्हा योगेशने डॉक्टरांचे आभार मानले. डॉक्टरांनी कमीत कमी खर्चात आजोबांवर उपचार केले. आजोबांना शुद्ध आल्यानंतर सर्व–प्रसंग त्यांना कथन करण्यात आला. आजोबांचे डोळे या योगेशने केलेल्या सहकार्य व प्रेमामुळे आनंदाने भरून आले. त्यांनी त्याला कवटाळून घेतले व म्हणाले, 'योगेश, मी निराधार नाही. मला नातेवाईक आहेत, परंतु तरीदेखील माझी व्यवस्था माझ्या मुलाने वृद्धाश्रमात केली आहे' आजोबांनी योगेशच्या वडिलांना जवळ बोलावले व म्हणाले, 'खरच तुम्ही खूप भाग्यवान आहात ! योगेश सारख्या गुणी, सुसंस्कारित मुलाने तुमच्या पोटी जन्म घेतला !

आजोबा पुढे म्हणाले की, ''मी माझ्या मुलाला खूप मोठे शिक्षण दिले; परंतु संस्कार देऊ शकलो नाही, याची खंत मला वाटते. पण मला असे वाटते की, शिक्षणाबरोबरच संस्कारदेखील अत्यंत महत्त्वाचे असतात. नुसतेच सुशिक्षित असून चालणार नाही, तर सुसंस्कृतही असायला हवे. जे शिक्षण जीवन कसे जगावे यासाठी उपयोगात येते तेच खरे शिक्षण, जे तुझ्या आई वडिलांनी तुला दिले.

**सुरेंद्र बाळासाहेब दांडगे (स.शि.)**

म.न.पा. प्रा.शा. विटखेडा, औरंगाबाद.

# कष्टाचे फळ

सरु नि पारु दोघी जुळ्या बहिणी. रोज मिळून शाळेत जात. मिळून अभ्यास करीत. दोघीही हुशार, चतुर, गुणी आणि कष्टाळू होत्या.

त्यांची घरची परिस्थिती साधारणच होती. आई-वडील मोलमजुरी करून घर चालवत होते. आपल्या मुली चांगले शिक्षण घेत आहे हे बघून त्यांना आनंद होत होता. आई बाबांना मदत व्हावी म्हणून आपण काहीतरी करावे असे दोघींना वाटले.

शाळेजवळ एकही खाऊची गाडी नाही, तेव्हा आपण छानसा भेळचा स्टॉल लावावा त्यातून काहीतरी कमवावे, असे त्यांनी दोघींनी ठरविले. दोघींचा विचार पक्का झाला. रात्री बाबां घरी आले. दोघी बाबांसमोर उभ्या राहिल्या. ''काय ग पोरींनो, काय झाले ? बाबांनी विचारले, '' बाबा आम्ही दोघी भेळचा स्टॉल सुरू करू का?'' दोघींचा हट्ट बघून बाबांना नवलच वाटले. त्यावर दोघी म्हणाल्या, ''आम्ही शाळा सुटली की हा उद्योग करु. घराला आमचाही थोडा हातभार लागेल.'

बाबांनी दोघींचा उल्हास पाहून आपल्या मालकाकडे हातउसने पैसे घेतले. पहिले थोडे दिवस त्या दोघींना मदत केली. आईने दोघींना भेळ कशी करायची , तिखट-मिठाचे प्रमाण दाखवले. भेळ करताना घ्यायची काळजी सांगितली.



सरु आणि पारुने सगळे काही शिकून घेतले. त्यासाठी खूप मेहनत केली. त्यांना चांगले गिऱ्हाईक मिळू लागले. कारण रुचकर भेळ तयार होऊ लागली.

लवकरच त्यांची भेळ संपूर्ण गावात प्रसिद्ध झाली. त्यांच्याकडे लोकांची रीघ लागू लागली. घरची आर्थिक परिस्थिती सुधारू लागली. आपला व्यवसाय सांभाळत दोघींनी चांगले शिक्षण घेतले. त्यांच्या कष्टाला फळ मिळाले.

**सोनाली थोरात (स.शि.)**

म.न.पा. प्रा. शाळा, नागेश्वरवाडी, औरंगाबाद.

# पहाड कापणारा देवमाणूस

बिहार राज्यातील गेल्होर हे निसर्गाच्या कुशीत वसलेलं छोटस पण टुमदार गाव. या गावात मोलमजुरी, काबाडकष्ट करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाहर करणारे एक गृहस्थ राहात. त्यांचे नाव दशरथ मांझी.'' त्यांच्या घरात पत्नी व दोन मुलांसह ते सुखाने राहत. गेल्होर या गावाच्या शेजारी मोठा डोंगर व त्या डोंगरापलीकडे वझीरगंज नावाचे दुसरे गाव. हे गाव मोठे त्यामुळे येथे शाळा, दवाखाना, रस्ते, वीज या सर्व सुविधा होत्या. पण गेल्होर या खेडेगावात यांपैकी काहीच नव्हते.

एकदा दशरथ मांझी यांची पत्नी फुगनी खूप आजारी पडली. गावात दवाखाना नसल्याने शेजारच्या वझीरगंज गावात नेणे आवश्यक होते. पण दशरथ मांझींना प्रश्न पडला न्यावे कसे डोंगर चढून जावे तर पत्नी चालू शकत नाही आणि डोंगराला वळसा घालून जावे तर अंतर जवळपास ७५ कि.मी. पण वेळ कमी असल्याने कोणताच पर्याय नव्हता व अशातच दशरथ मांझी यांच्या पत्नीचे दु:खद निधन झाले. दोन चिमुकले आईच्या मायेला कायमचे मुकले.

लवकरात लवकर आपण पत्नीला वझीरगंज गावामध्ये घेऊन जाऊ शकलो नाही कारण हा डोंगर आडवा आला. जी वेळ आपल्या कुटुंबावर आली ती वेळ गावातील इतर कुटुंबावरही येऊ शकते. या विचाराने त्यांचे मन सुन्न झाले. व त्यांनी मनाशी एक निश्चय केला की हा डोंगर कापून त्यातूनच एक रस्ता तयार करायचा. यासाठी त्यांनी शेळ्या विकल्या व त्यातून आलेल्या पैशातून एक हातोडा, छन्नी  व टोपली विकत घेतली. ते सर्व साहित्य घेऊन त्यांनी डोंगर चढायला सुरूवात केली आणि ते थेट जाऊन पोहचले ते डोंगराच्या सर्वात उंच टोकावर व तेथे त्यांनी डोंगर फोडण्यासाठी हातोड्याचा पहिला घाव घातला.

हाती घेतलेले काम सोपे मुळीच नव्हते. पण निश्चिय दृढ होता. रोज डोंगरवर जाणे व डोंगर फोडणे सुरू होते. बघता बघता १ वर्ष, २ वर्ष, ३ वर्ष अशी वर्षामागून वर्षे गेली पण कामात खंड नव्हता. जणू त्यांच्यात व पहाडात एकमेकांना हरवण्याची स्पर्धाच सुरू होती.

आईविना पारखी झालेली दोन निरागस व कोमल मुलं दारात होती. त्यांचेही संगोपन करायचे यासाठी गरजेपुरती मोलमजुरी ते करीत व उरलेला सर्व वेळ ते पहाड फोडण्यासाठी

देत. अशा प्रकारे तब्बल बावीस वर्ष त्यांचे हे काम अखंडपणे सुरू होते. बावीस वर्षांनंतर त्यांच्या प्रयत्नाला यश आले. त्यांनी तो पूर्ण डोंगर मधोमध कापून त्यातून रस्ता तयार केला होता.

आता वझीरगंज गाव हे डोंगरातल्या रस्त्याने जवळ आले. त्या गावातील शाळा, दवाखाना व इतरही सुविधांचा लाभ गावातील सर्वांना होणार होता.

बालमित्रांनो, आता वेळ आपली आहे. आपल्या आजूबाजूच्या असणाऱ्या विविध समस्यांना फोडण्यासाठी आपण सज्ज होऊ या. कारण दशरथ मांझी यांनी म्हटले होते, हे काम मी केले नसते तर कुणीच केले नसते.

प्रशांत कुलकर्णी (साधनव्यक्ती)

म.न.पा. स.शि.अ.,औरंगाबाद.



# बदललेला मित्र

एका शाळेत तिसरी च्या वर्गात एक मुलगा होता. त्याचे नाव यश. तो स्वभावाने प्रेमळ व गरीब होता. वर्गातल्या प्रत्येक मुलाला तो मदत करीत असे. अभ्यासतही हुशार. खेळात पुढे. त्याच्याच वर्गातील विनय नावाचा मुलगा खूप खोडकर व बंड होता. विनय सगळ्यांना नेहमी त्रास देत असे. घरीसुद्धा सर्वांना त्रस्त करून सोडत असे. त्याचे आई, वडील व घरातील त्याची भावंडं त्याच्या ह्या सवयीमुळे हैराण झाले होते.

एके दिवशी वर्ग शिक्षिकेने यश व विनयला एका बाकावर बसवले. विनयने यशचे पुस्तक फाडले, वहीवर रेघोट्या मारल्या, खोडरबर तोडले, पेन्सिल चावून चावून खराब केली. त्याचा डब्बा खाली पाडला. डब्बा खाली पाडल्यामुळे डब्यातील पोळी-भाजी खराब झाली. त्याला त्या दिवशी उपाशीच रहावे लागले. पण विनयला त्याचे काहीच वाटले नाही. विनयने यशला त्याच्या डब्यातलेसुद्धा काही खायला दिले नाही. विनयची बाईंकडे सर्वजण तक्रार करत असत पण यश कधीच कोणाचीही तक्रार करत नसे. सर्व निमूटपणे सहन करत असे.

त्यादिवशी शनिवार होता. शाळा अर्ध वेळ असल्यामुळे लवकर सुटली. सर्व जण आपापल्या घरी जात होते. विनयने सुबोधच्या पाठीत जोराने एक बुक्की मारली व तेथून धूम ठोकली.

तेवढ्यात समोरून एक मोठा बैल आला व व विनयच्या मागे लागला. विनय पुढे



पळत होता व बैल त्याच्या मागे पळत होता. विनय घाबरून सैरावेरा पळत होता. वर्गातील काही मुले तिथेच होती. पण त्याच्या मदतीसाठी  कुणीही पुढे आले नाही. उलट सर्व मुले म्हणाली, ''या विनयला असेच पाहिजे, तो नेहमी दुसऱ्यांना त्रास देतो. आज बरा बैलाच्या तावडीत सापडला.'' ती मुले तिथून निघून गेली. यश मागून येत होता, त्याने ते दृश्य पाहिले व लगेच विनयची मदत करण्यासाठी धावला. विनयने आपल्याला सर्व मुले सोडून निघून गेली हे पाहिले असल्यामुळे तो खूप घाबरला होता. त्याला भीती वाटत होती. यश आपली मदत करण्यासाठी आला हे पाहून त्याला आनंदही झाला व त्याला हायसे वाटले.

यश त्याला म्हणाला, ''तू तुझे दप्तर माझ्याकडे दे.'' यशकडे दप्तर दिल्यानंतर तिथेच पडलेला एक मोठा दगड त्याने बैलाकडे भिरकावला. तेवढ्यात यश मदतीसाठी जोरजोरात ओरडू लागला. मारलेला, दगड बैलाच्या पायाला लागल्यामुळे तो आणखीनच चवताळला आणि विनयच्या मागे लागला. यशने जवळच पडलेली काठी त्याच्या पाठीवर मारली, तितक्यात तिथे दोन-चार मोठी माणसे आली व सर्वांनी बैलाला पळवून लावले. बैल तिथून निघून जाताच विनयने यशला घट्ट मिठ्ठी मारली व म्हणाला, ''मला, माफ कर, मी आजपर्यंत तुला सतत त्रास दिला आहे, तरी तू माझी मदत केलीस. धन्यवाद मित्रा !'' सर्व मुले मला सोडून गेली; पण तूमात्र माझ्या मदतीसाठी धावून आलास!''

आजपासून मी तुला त्रास देणार नाही. आपण छान अभ्यास करुन पहिला नंबर मिळवू!

**शिल्पा अनिलराव मोगरकर (साधनव्यक्ती)**

म.न.पा., स.शि.अ.,औरंगाबाद.



# माझ्या स्वप्नातील औरंगाबाद शहर





# मूठभर गोष्टी

**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**

**समग्र शिक्षा अभियान-शिक्षण विभाग**